## नियमित दिवाणी दावा क्र. ४१०/२०२३ मधील अर्ज नि.क्र.२० वरील आदेश
## (पारित दिनांक २१/०९/२०२४)

**१.** प्रस्तुतचा अर्जाद्वारे प्रतिवादी क्र.१ ते ४ यांनी त्यांचे विरुध्द झालेला 'कैफियत नाही' चा आदेश रदद होऊन त्यांची कैफीयत/म्हणणे दाखल करुन घेणेकामी विनंती केलेली आहे.

**२.** प्रतिवादींचा अर्ज व त्यावरील वादीचे म्हणणे वाचले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला.

**३.** प्रतिवादी यांच्या अर्जामधील कथन असे की, प्रतिवादी यांचे माहितगार वकील व संबंधीत प्रतिवादी यांचा वेळेवर संपर्क न झाल्याने व पुरेशा माहिती अभावी मुदतीत म्हणणे/कैफियत दाखल करता आले नाही त्यामुळे प्रतिवादी यांच्या विरुध्द कैफियत नाही असा आदेश पारीत झालेला आहे. सदचा आदेश रद्द केल्यास प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांनी कैफियत दाखल करण्याची संधी दिल्यास मा. न्यायालयास उचित न्यायदान करणे सुलभ होणार आहे. त्यामुळे प्रतिवादी यांनी त्यांच्या विरुध्द झालेला 'कैफियत नाही' रदद होवुन त्यांची कैफियत व म्हणणे दाखल करुन घेण्याची विनंती केली आहे.

**४.** वादीने नि.क्र. २१ कडे आपले म्हणणे दाखल करुन प्रस्तुत अर्जामधील कथने नाकारलेली आहेत. प्रतिवादी यांचा अर्ज खरा व प्रमाणिकपणाचा नाही. प्रतिवादी यांना दाव्याच्या समन्सची बजावणी माहे डिसेंबर २०२३ मध्ये झालेली आहे. त्यानंतर प्रतिवादी यांनी केवळ वेळकाढूपणा करुन अधिकारक्षेत्राबाबत अर्ज दिला व त्यात बराच कालावधी घालवून पुन्हा तो अर्ज चालविण्याचा नसल्याबाबत पुरसीर अभिलेखावर ठेवली. प्रतिवादींनी सदरचा आदेश रद्द करण्याबाबत ठोस व संयुक्तीक कारण दिलेले नाही. मा. न्यायालय प्रतिवादींचा अर्ज मंजुर करणेच्या निर्णया पर्यंत आलेस प्रतिवादी यांना जास्तीत जास्त कॉस्ट करणेची विनंती वादी यांनी केली आहे.

**५.** अर्जामधील कथने प्रतिवादी यांनी शपथेवर सांगितलेली आहेत. प्रस्तुत दाव्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, प्रतिवादी यांनी मुदतीत प्रस्तुत दाव्यात त्यांची कैफियत/म्हणणे दाखल केले नसल्यामुळे प्रतिवादी क्र. १ ते ४ यांचे विरुध्द दिनांक २०/०८/२०२४ रोजी "कैफियत नाही"चा आदेश पारीत झालेला आहे. प्रतिवादी यांचे माहितगार वकील यांच्याशी प्रतिवादी यांचा वेळेवर संपर्क न झाल्यामुळे प्रतिवादी यांना दाव्यास कैफियत दाखल करता आलेले नाही. प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरिता दाखल केलेला आहे. प्रस्तुत प्रकरण हे वादी यांचा पुराव्याकरिता प्रलंबित असून प्रतिवादी यांना दाव्यात हजर होऊन त्यांची कैफियत अभिलेखावर आल्यास वादीचे कसलेही नुकसान होणार नाही. याउलट, प्रतिवादींची कैफीयत अभिलेखावर आल्यास प्रस्तुतचा दावा अंतिम गुणदोषाद्वारे निकाली काढण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नैसर्गिक न्यायतत्वास अनुसरून प्रतिवादींना एक संधी देणे योग्य व न्यायोचित होणार आहे. परंतु प्रतिवादींच्या विलंबामुळे दावेचे कामकाज लांबणीवर पडलेने प्रतिवादी यांचा अर्ज रक्कम रु.५००/– नुकसान भरपाई म्हणून वादी यांना देण्याच्या अटीवर मंजूर करणे मला न्यायाचे वाटते. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी क्र. १ ते ४ यांच्या विरुध्द झालेला 'कैफियत नाही' आदेश रक्कम रुपये ५००/– (अक्षरी रुपये पाचशे रुपये मात्र) वादी यांना देण्याच्या अटीवर रदद करण्यात येतो.

३. प्रतिवादींनी खर्चाची रक्कम वादी यांना दिल्यानंतर त्यांची कैफियत व म्हणणे अभिलेखावर घेण्यात यावे.

CHONDE GAJANAN GOVINDRAO

Digitally signed by CHONDE GAJANAN GOVINDRAO
Date: 2024.09.21 16:29:12 +0530

सांगली. **( जी. जी. चोंडे )**

दि.२१/०९/२०२४ तिसरे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, सांगली.